# मुकुल माधव फाउंडेशनची सेरेब्रेल पाल्सीग्रस्तांना मदत

पुणे, दि. १० (प्रतिनिधी) - सायक्लोथॉनच्या दरम्यान सेरेब्रेल पाल्सीग्रस्त मुले शारीरिक विकलांगतेमुळे शाळांपासून दूर राहतात. त्यासाठी पहिल्या टप्प्यात मुलांना बसण्यासाठी १०० खुर्च्यांसाठी ५.२५ लाख रुपये उपलब्ध करून दिले आहेत. शारीरिक विकलांगतेवर मात करून या मुलांचा विकास होईल, असा विश्वास मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितु छाब्रिया यांनी व्यक्त केला.

मुकुल माधव फाउंडेशन (एमएमएफ) फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड व बायसिकल एन्जल्स यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे ते रत्नागिरी सायक्लॉथॉनचे आयोजन केले आहे. एमएमएफचा एक उपक्रम असून, सीएसआर उपक्रमांतर्गत तो प्रायोजित केला आहे. पाच दिवसांच्या कार्यक्रमात बायसिकल एंजेल्सतर्फे गरजूंना उपजीविकेसाठी सायकल वाटप करण्यात येणार आहे.

दरम्यान, फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या सहकार्याने एमएमएफच्या वतीने चार जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये वैद्यकीय शिबिराचे आयोजन केले आहे. शिरवळ आणि उंब्रज येथील जि.प.च्या शाळेमध्ये ११११, तर कोकरूड येथील जि.प. शाळेत १० डिसेंबर रोजी २६० मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. पाली येथील जि.प. शाळेत ११ व १२ डिसेंबर रोजी १८०० मुलांची तपासणी करण्यात येणार आहे.

रिचमंड युनिव्हर्सिटीच्या आजी व माजी विद्यार्थ्यांनी फंडरेझर प्रोग्राम करून २.२५ लाख रुपये उभे केले आहेत.